दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | बुधवार, 7 ऑक्टोबर 2026 | | अंक क्र. 145 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

### पशुधनाला वेळेत चारा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करावे

## दुष्काळ आढावा बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी केल्या महत्वाच्या सूचना

### शासकीय क्षेत्रांसह धरणांच्या गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांची लागवड करण्याचे निर्देश देण्याचा मांडला मुद्दा





**मुंबई |** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा उपलब्धतेचे वेळेत नियोजन करावे. त्यासाठी हायड्रोपोनिक्स, अझोला व सायलेज यांसारख्या पर्यायी चारा पद्धतींचा वापर करावा, यासह काही महत्वाच्या सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुष्काळविषयक आढावा बैठकीत केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक-पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत समितीच्या सदस्य मंत्री पंकजाताई मुंडे, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील, नितेश राणे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, गिरीष महाजन, बाबासाहेब पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**■ चारा आणि दुष्काळासाठी**

बैठकीत ना. पंकजाताई मुंडे यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. वन विभागाच्या जमिनी, शासकीय प्रक्षेत्रे, विविध विभागांच्या अखत्यारीतील शासकीय क्षेत्रे तसेच विविध धरणांच्या बॅकवॉटरमधील गाळपेर क्षेत्रावर चारा पिकांची लागवड करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात, असेही मंत्री मुंडे यांनी यावेळी मागणी केली.

**सीएसआरची मदत घेणार**

राज्यात दुष्काळ निवारणासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. पाणी असलेल्या ठिकाणी चारा बँक करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील विविध कंपन्याची सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून मदत घेतली जाणार आहे. सर्व तालुक्याला समान न्याय देण्यासाठी जास्तीत जास्त कंपन्यांनी सीएसआरसाठी मदत करण्याचे आवाहन मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले.

## गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची कु.भक्ती पवार तलवारबाजीत जिल्हास्तरावर रौप्य पदक मिळवत विभागीय स्तरावर निवड

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

येथील श्रीमती गोडावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थीनी कु. भक्ती भाऊसाहेब पवार हिने जिल्हास्तरीय तलवारबाजी मध्ये आपली कर्तबगारी दाखवत रौप्य पदकाची कमाई करन या विजयाच्या बळावरच विभागीय स्तरावर खेळण्यासाठी तिची निवड करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य (पुणे) अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धेत भक्ती भाऊसाहेब पवार हिने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. या दैदिप्यमान यशामुळे तिची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

नुकत्याच दिनांक ०४ ऑक्टोबर २०२६ रोजी तालुका क्रीडा संकुल, अंबाजोगाई येथे पार जिल्हास्तरीय विविध शालेय स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत विविध ठिकाणाहून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. १९ वर्षाखालील मुलींच्या गटात कु. भक्तीने हे यश संपादन केले. कु. भक्ती पवार ही अंबाजोगाई येथील श्रीमती गोदावरीबाई कुंकुलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी असून तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. कु. भक्तीला तिच्या प्रशिक्षकासह विद्यालयाच्या मुख्याध्यापक तसेच कुटुंबियांचे मोलाचे सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. तिच्या पुढील विभागीय स्पर्धेतील वाटचालीसाठी विद्यालयासह क्रीडा तसेच शैक्षणिक स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



## विद्यावर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची तलवारबाजी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड

**परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र युवक व क्रीडा संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा स्तरीय तलवारबाजी कीडा स्पर्धा संपन्न झाली.

दिनांक 04 व 05 ऑक्टोबर 2026 रोजी अंबेजोगाई तालुका क्रीडा संकुल, अंबेजोगाई येथे जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा संपन्न झाली. यामध्ये आपल्या विद्यावर्धिनी विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

यामध्ये 14 वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये चि. स्वराज किशन हत्ते यांची जिल्हयाच्या संघात निवड झाली आहे. त्या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धासाठी त्यांची निवड झाली आहे. यामध्ये बीड जिल्हयाचे नेतृत्व तो करणार आहेत.

त्याबददल चि. स्वराज हत्ते या विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष, सचिव सर्व संचालक मंडळ आणि शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले.



## बंडू अघाव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन मुंबईत गौरव

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी येथील प्रियानगर भागातील भगवान प्राथमिक विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक बंडू भगवानराव अघाव यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल पुणे येथील कल्याणम् एज्युकेअर या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा 'राज्यस्तरीय उपक्रमशील आदर्श शिक्षक पुरस्कार' देवून गौरविण्यात आले आहे.



मुंबई येथील आझाद मैदान परिसरातील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात गेल्या शुक्रवारी (ता.२) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राज्यातील सर्व जिल्ह्यातून निवडले गेलेल्या सुमारे ७५ वर आदर्श शिक्षकांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. या समारंभाला माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, समृद्धी महामार्गाचे मुख्य अभियंता साहेबराव सुरवसे, मीराभाईंदर महानगरपालिकेच्या माजी महापौर निर्मलाताई सावळे, ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव कांडेकर, सुभाषराव पाटील, सिने अभिनेत्री दिव्यांशी डे, कल्याणम् एज्युकेअरचे प्रमुख ॲड. कल्याण नेहरकर आदी मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, गौरवपत्र देवून, फेटा बांधून श्री अघाव यांचा गौरव करण्यात आला. मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर संजय घाडी यांनी शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.

गेल्या तीनहून अधिक दशकांपासून परळीच्या शिक्षण, सहकार, शिक्षक चळवळ आदी क्षेत्रात कार्यरत असलेले आदर्श शिक्षक म्हणून बंडू अघाव यांची ओळख आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे ते सक्रीय कार्यकर्ते आहेत, शिवाय महात्मा फुले शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेवून कल्याणम् एज्युकेअर पुणे या संस्थेने उपक्रमशील आदर्श शिक्षक म्हणून त्यांची निवड करून या समारंभात गौरव केला. या गौरवाबद्दल श्री अघाव यांचे येथे शिक्षक, कार्यकर्ते व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.

## 24 वर्षे देशसेवा करून जन्मभूमीत परतणाऱ्या मराठा लाईट इन्फंट्रीच्या जनार्दन आव्हाड यांचा भव्य नागरी सत्कार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

भारतीय सेनेच्या प्रसिद्ध 'मराठा लाईट इन्फंट्री' (काली पाचवीन) रेजिमेंट सेंटरमधून तब्बल २४ वर्षे भारतमातेची अखंड व शौर्यपूर्ण सेवा करून निवृत्त झालेले वीर जवान श्री जनार्दन शिवाजी आव्हाड हे आपल्या जन्मभूमीत परतत आहेत. सीमांचे रक्षण करून कर्तव्य बजावल्यानंतर आपल्या मूळ गावी परतणाऱ्या या वीर सुपुत्राच्या स्वागतासाठी बेलवाडीसह संपूर्ण परळी तालुक्यात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

या गौरवशाली सेवापूर्तीनिमित्त त्यांच्या भव्य सेवानिवृत्ती सोहळ्याचे व नागरी सत्काराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे.

२४ वर्षांची प्रदीर्घ देशसेवा: भारतीय सेनेतील 'मराठा लाईट इन्फंट्री' (काली पाचवीन) मधून जनार्दन आव्हाड यांनी कठीण परिस्थितीत अत्यंत निष्ठेने आणि धैर्याने देशाच्या सीमांचे रक्षण केले.

कर्मभूमीतील कर्तव्य पूर्ण करून आपल्या जन्मभूमीत परतणाऱ्या सुपुत्राचे स्वागत करण्यासाठी ग्रामस्थ व आव्हाड परिवाराकडून विशेष तयारी करण्यात आली आहे.

दक्षिण मुखी गणपती मंदिरा जवळ, बेलवाडी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.




स्नेह भोजन: सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्यानंतर उपस्थित सर्व नागरिक, आप्तेष्ट व ग्रामस्थांसाठी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

सैनिकी सेवेतून निवृत्त होऊन गावात परतणाऱ्या या वीर जवानाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी परिसरातील देशप्रेमी नागरिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलखावेगळी माणस : प्लास्टिक पासून कलाकृती आणि प्रदूषणमुक्ती

प्लास्टिक कचऱ्यापासून कला निर्माण करणाऱ्या अनेक कलाकारांपैकी दिल्लीचे कलाकार मनवीर सिंह गौतम, म्हणजेच “Plasticvalla”, हे विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांनी टाकाऊ प्लास्टिकला केवळ सजावटीची वस्तू न मानता चित्रकला, शिल्पकला आणि पर्यावरण-जागृतीचे प्रभावी माध्यम बनवले आहे. मनवीर सिंह गौतम हे भारतातील अशा कलाकारांपैकी एक आहेत ज्यांनी नॉन-रिसायकल किंवा कठीणपणे रिसायकल होणाऱ्या प्लास्टिकला आपल्या कलेचे प्रमुख माध्यम बनवले आहे. ते दिल्लीमध्ये कार्यरत आहेत. त्यांची कला म्हणजे केवळ सुंदर चित्र किंवा शिल्प नाही; त्यामागे प्लास्टिक प्रदूषणाविषयी समाजाला विचार करायला लावण्याचा उद्देश आहे.

मनवीर यांची सुरुवात पारंपरिक पद्धतीच्या लँडस्केप चित्रांपासून झाली. निसर्गाची चित्रे काढताना त्यांच्या लक्षात आले की प्रत्यक्ष निसर्गामध्ये मात्र प्लास्टिकचे प्रमाण वाढत आहे. हिरवीगार जमीन, डोंगर, नद्या आणि परिसर यांच्याऐवजी अनेक ठिकाणी प्लास्टिकचा कचरा दिसू लागला.यातून त्यांच्या विचारात महत्त्वाचा बदल झाला—निसर्गाचे चित्रण करण्याऐवजी निसर्गाच्या संरक्षणासाठी कला करावी, असा विचार त्यांनी मांडला. याच विचारातून ‘Plasticvalla’ ही त्यांची कलात्मक ओळख निर्माण झाली. सामान्य चित्रकार कॅनव्हासवर रंग वापरतो. परंतु Plasticvalla यांच्यासाठी टाकाऊ प्लास्टिकच कलेचे माध्यम आहे.

ते प्रामुख्याने Multi-Layered Plastic (MLP) आणि RIC क्रमांक 7 असलेल्या काही प्लास्टिक साहित्याचा वापर करतात. हे साहित्य वेगवेगळ्या प्रकारच्या पॅकेजिंगमध्ये आढळते आणि सहजपणे पुनर्वापर करता येत नाही. फेकून दिलेल्या प्लास्टिकच्या तुकड्यांचे रंग, आकार, पोत आणि चमक यांचा विचार करून ते त्यांची कलाकृती तयार करतात. त्यामुळे एखाद्या प्लास्टिकच्या पिशवीचा तुकडा, पॅकेजिंगचा तुकडा किंवा दुसरा कचरा हा त्यांच्या हातात चित्रातील रंगासारखा वापरला जातो.

घराघरातून प्लास्टिक गोळा करण्याचा उपक्रमत्यांच्या कामातील एक वैशिष्ट्य म्हणजे हे प्लास्टिक केवळ कचरा डेपोमधून घेतले जात नाही. उपलब्ध माहितीनुसार त्यांच्या कलाकृतींसाठी दिल्लीतील 400 पेक्षा जास्त घरांमधून टाकाऊ प्लास्टिक गोळा करण्यात आले आहे. यामुळे त्यांच्या कलेला आणखी एक सामाजिक पैलू मिळतो. लोकांनी प्लास्टिक कचरा वेगळा करावा, त्याचा योग्य पुनर्वापर व्हावा आणि तो थेट लँडफिलमध्ये जाऊ नये, असा संदेश त्यांच्या कामातून दिला जातो.250 किलो प्लास्टिक लँडफिलपासून वाचवलेही बाब त्यांच्या कलेचे वेगळेपण स्पष्ट करते. त्यांच्या दृष्टीने कलाकृती तयार करणे हा अंतिम उद्देश नसून कचऱ्याचे प्रमाण कमी करणे आणि लोकांच्या विचारात बदल घडवणे हा त्यामागचा मोठा हेतू आहे.Plasticvalla यांच्या कलेचे वर्णन “Trash to Treasure” म्हणजेच कचऱ्याचे मौल्यवान कलाकृतीत रूपांतर असे करता येईल.त्यांच्या कलाकृतींकडे पाहिल्यावर सुरुवातीला त्या रंगीत चित्रांसारख्या दिसतात. मात्र जवळून पाहिल्यावर त्यातील रंग आणि पोत हे प्रत्यक्षात वापरून फेकून दिलेल्या प्लास्टिकच्या तुकड्यांपासून तयार झालेले आहेत.2026 मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनपर अभ्यासात मनवीर




सिंह गौतम यांच्या कलाकृतींचा पर्यावरण, सामाजिक संदेश आणि सर्जनशील पद्धतीच्या दृष्टीने अभ्यास करण्यात आला आहे. प्लास्टिकपासून कला निर्माण करण्याचे महत्त्व केवळ सौंदर्यापुरते मर्यादित नाही. ती पर्यावरणीय कला आणि अपसायकलिंग यांचा संगम आहे.. याच कारणामुळे Plasticvalla यांची कला “कचरा कमी करा” एवढाच संदेश देत नाही, तर “कचऱ्याकडे पाहण्याची आपली दृष्टी बदला” असा व्यापक संदेश देते.

# असा लागला शोध : कंगवा



केस विंचरण्याच्या कंगव्याचा (फणीचा) शोध नेमका एका व्यक्तीने लावलेला नाही, तर मानवी संवर्धनाच्या आणि इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात हजारो वर्षांपूर्वी तो उपयोगात आला. पुरातत्त्वशास्त्रज्ञांच्या मते, जगातील सर्वात जुना कंगवा सुमारे ५,००० ते ८,००० वर्षांपूर्वीचा (इ.स.पूर्व ५००० ते ८००० च्या सुमारास) सीरिया आणि पर्शियामध्ये आढळला आहे. मानवी हाताच्या बोटांवरून प्रेरणा घेऊन प्राच्यकाळातील लोकांनी प्राण्यांच्या हाडांपासून, लाकडापासून किंवा दंतहत्तीपासून कंगवा बनवला. सुरुवातीला केसांमधील गुंता सोडवणे, केस नीटनेटके ठेवणे, आणि केसांमधील मळ किंवा उवा काढण्यासाठी याचा वापर केला जाई. प्राचीन इजिप्तमध्ये सोन्याने व मौल्यवान रत्नांनी मढवलेले कंगवे केवळ राजे-महाराणी वापरत असत, ते त्यांच्या श्रीमंतीचे प्रतीक मानले जात असे. १९ व्या शतकात रबर आणि नंतर २० व्या शतकात प्लास्टिकच्या साहाय्याने कंगवे स्वस्त आणि मोठ्या प्रमाणावर बनवले जाऊ लागले, जे आज प्रत्येक घरात वापरले जातात.

# दखल : २०७० च्या नेट झिरो ध्येयाकडे महाराष्ट्राची वाटचाल




“इलेक्ट्रिक रोड फ्रेटच्या संक्रमणामध्ये महाराष्ट्राला नेतृत्व करण्याची संधी आहे. आपल्या मजबूत औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पायामुळे, उद्योगांना मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक ट्रक स्वीकारण्यास सक्षम करणारे व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य मॉडेल तयार करण्यासाठी राज्य सुस्थितीत आहे. आता मालक, फ्लीट ऑपरेटर, वाहन उत्पादक, वित्तीय संस्था, ऊर्जा पुरवठादार आणि पायाभूत सुविधा विकासक यांना एकत्र आणणारी एक परिसंस्था (इकोसिस्टम) तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे, तसेच हे संक्रमण तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आणि व्यावसायिकदृष्ट्या आकर्षक असेल याची खात्री केली पाहिजे,” असे महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. बिपिन श्रीमाली, आयएएस, व्यवस्थापकीय संचालक, महाप्रीत यांनी मुंबईतील एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे महाप्रीत (महात्मा फुले रिन्यूएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेड) आणि इंटेंट यांनी आयोजित केलेल्या “महाराष्ट्रामध्ये इलेक्ट्रिक रोड फ्रेटकडे संक्रमणाला गती देणे” या विषयावरील गोलमेज परिषदेत सांगितले. श्री. श्रीमाली पुढे म्हणाले, “इलेक्ट्रिक-ट्रकिंग परिसंस्थेसमोर सध्या ‘कोंबडी आधी की अंडे आधी’ असे आव्हान आहे. एकीकडे, वापरकर्ते वाहने घेण्यापूर्वी पुरेशा चार्जिंग पायाभूत सुविधांची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे, पायाभूत सुविधा विकासकांना गुंतवणुकीचे समर्थन करण्यासाठी पुरेशी मागणी आवश्यक आहे. उदाहरणार्थ, महाप्रीत आपल्या अखिल भारतीय कार्यक्षेत्रानुसार, ६४ मोठी ईव्ही चार्जिंग स्टेशन्स विकसित करत आहे आणि एनएचएआय प्रथमच यासाठी मार्गाधिकार उपलब्ध करून देत आहे. आम्ही बंदरे, खत कंपन्या, खाणकाम आणि इतर मालवाहतूक-प्रधान क्षेत्रांमधील मागणी एकत्रित करण्यासाठी हरित मालवाहतूक कॉरिडॉरच्या शक्यताही पडताळून पाहत आहोत.”

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

# परळीचा पाणीपुरवठा : तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी तोडग्याची मागणी ; जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

## वाढीव पाणीपुरवठा योजनेला तातडीने मंजुरी द्या, माजलगावचे पाणी वाण धरणाला लिफ्ट करा, खडका बंधार्यातून पाणी द्या आदी आग्रही मागण्या

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

दरवर्षी उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटातून परळीकरांची कायमची सुटका करण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याची मागणी नगर परिषदेच्या वतीने परळीतील नगरसेवकांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे केली.वाढीव पाणीपुरवठा योजनेला तातडीने मंजुरी द्यावी, माजलगावचे पाणी वाण धरणात लिफ्ट करावे, खडका बंधार्यातून पाणीपुरवठ्यावर प्रशासकीय मंजुरी आदी आग्रही मागण्या करण्यात आल्या.यावर जिल्हाधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

बीड जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या परळी दौऱ्यादरम्यान तहसील कार्यालयात झालेल्या भेटीत शहराच्या पाणीप्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. परळी शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन पाणीपुरवठ्याचा सविस्तर आराखडा शासनाकडे सादर करावा. तसेच शहरासाठी प्रस्तावित वाढीव पाणीपुरवठा योजनेला तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी शासनस्तरावर ठोस शिफारस व सातत्याने पाठपुरावा करावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. दरवर्षी टंचाईच्या काळात तात्पुरत्या उपाययोजना करण्यापेक्षा शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन शाश्वत व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनानुसार परळीच्या पाणीप्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणासाठी प्रयत्न सुरू आहेत.या अनुषंगाने परळीसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करणे, माजलगाव येथून नागापूर येथील वाण धरणात पाणी लिफ्ट करणे त्याचबरोबर खडका बंधार्यातून परळीसाठी पाणीपुरवठ्यास प्रशासकीय मंजूरी देणे आदी बाबी महत्त्वपूर्ण असुन त्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली. या मागण्यांवर जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, जयपाल लाहोटी, दिपक मुंडे, हाजी बाबा, शकील कुरेशी, अझीझ कच्छी, लक्ष्मण मुरकुटे,अनंत इंगळे, महेंद्र रोडे,भीमा डावरे,रमेश पवार आदींसह उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, न.प. मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, न.प. पदाधिकारी,अधिकारी उपस्थित होते.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा २० हजारांची वाढ करा!

## कृती समितीची राज्य शासनाकडे मागणी ; काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प

**पुणे (प्रतिनिधी):**

महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या हजारो शिक्षण सेवकांच्या मानधनात दरमहा २०,००० ची वाढ करण्यात यावी, अशी मागणी 'शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती, महाराष्ट्र राज्य' च्या वतीने राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. महागाईचा वाढता आलेख आणि नियमित शिक्षकांइतक्याच पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या विचारात घेता, शासनाने स्वतः ठरवलेल्या पुनरावलोकनाच्या धोरणानुसार त्वरित अंमलबजावणी करावी, असा सूर या मागणीमागे आहे.





■ **22 सप्टेंबर 2022 च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची वेळ**

शासनाच्या दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी तत्कालीन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मानधनाचा किमान चार वर्षांतून एकदा पुनरावलोकन (Review) करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मानधनात सुधारणा करण्यात आली असली, तरी गेल्या काही वर्षांत घरभाडे, प्रवास, अन्नधान्य, आरोग्य व दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सध्याचे मानधन अत्यंत अपुरे पडत असून, मानधनवाढीची पुनर्विचार प्रक्रिया शासनाने आतापासूनच सुरू करावी, अशी आग्रही मागणी समितीने केली आहे.

■ **काम नियमित शिक्षकांसारखे, मग मानधन अत्यल्प का?**

अध्यापनासोबतच परीक्षा कामकाज, मूल्यमापन, विविध शासकीय उपक्रम, विद्यार्थी-पालक मार्गदर्शन, शालेय अभिलेख, सर्वेक्षणे आणि प्रशासकीय कामकाज अशा सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या शिक्षण सेवक पार पाडत आहेत. "काम नियमित शिक्षकांप्रमाणे आणि मानधन मात्र अत्यल्प, ही विसंगती दूर होणे अत्यंत गरजेचे आहे," अशी भूमिका कृती समितीने मांडली आहे.

■ **राज्यभर तीव्र पाठपुरावा करणार**

या संदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, शालेय शिक्षण मंत्री, मुख्य सचिव आणि शिक्षण आयुक्तांना निवेदने पाठवण्यात येत असून, संपूर्ण राज्यात या मागणीसाठी व्यापक पाठपुरावा केला जाणार आहे.

■ **विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या शिक्षण सेवकांचे वर्तमान सुरक्षित करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. शासनाने मानधन पुनरावलोकनाचे तत्त्व मान्य केले असल्याने आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून न्याय द्यावा.**

संदीप भोसले (राज्य समन्वयक, शिक्षण सेवक मानधनवाढ कृती समिती)

■ **शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.**

दुर्गम भागात, वाड्या-वस्त्यांवर जाऊन ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षणसेवक शिक्षणव्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. मर्यादित मानधनामुळे त्यांना आर्थिक व मानसिक ताण सहन करावा लागतो. सन्मानजनक जीवन जगता यावे यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.

प्रा. शितल शिवाजी गोरे (शिक्षणसेवक)

# जुना व्हिडिओ नव्या घटनेचा भासवून प्रसारित; धस समर्थक आक्रमक

## कारवाईसाठी आष्टी पोलिसांना निवेदन; दोषींवर कठोर कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

**आष्टी (प्रतिनिधी)**

काही वर्षांपूर्वी घडलेल्या जुन्या घटनेचा व्हिडिओ सध्याच्या घटनेशी संबंधित असल्याचा भास निर्माण करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात येत असल्याचा आरोप करत आमदार सुरेश धस यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये गैरसमज व संभ्रम निर्माण होत असून, संबंधितांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन आष्टी पोलिस ठाण्यात देण्यात आले.



सध्या विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तसेच व्हॉट्सअॅप ग्रुपवर संबंधित जुना व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित केला जात आहे. मात्र, हा व्हिडिओ सध्याच्या घटनेचा असल्याचा चुकीचा संदेश दिला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा प्रकारे दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून सामाजिक व राजकीय वातावरणात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे समर्थकांनी म्हटले आहे.

या व्हिडिओच्या माध्यमातून आमदार सुरेश धस तसेच त्यांच्या कुटुंबीयांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही समर्थकांनी केला. त्यामुळे संबंधित सोशल मीडिया अकाउंट्सची चौकशी करून व्हिडिओचा मूळ स्रोत, तो कोणी आणि कोणत्या उद्देशाने प्रसारित केला, याचा सखोल तपास करण्याची मागणी पोलिसांकडे करण्यात आली.

■ **पोस्टचे स्क्रीनशॉट, लिंक पोलिसांकडे**

संबंधित सोशल मीडिया पोस्टचे स्क्रीनशॉट व लिंक पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सायबर गुन्हे शाखेच्या माध्यमातून चौकशी करून दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, जुना व्हिडिओ नव्या घटनेशी जोडून गैरसमज पसरविण्याचा प्रकार तातडीने थांबवावा. संबंधितांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आमदार सुरेश धस समर्थकांनी दिला आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांचे समर्थक मोठ्या संख्येने आष्टी पोलिस ठाण्यात उपस्थित होते.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांचे प्रबोधन

## मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाचा जनजागृती उपक्रम; विविध शाळांमध्ये मार्गदर्शन

**आष्टी | प्रतिनिधी**

वन्यजीव सप्ताह २०२६ चे औचित्य साधून आष्टी वन विभागाच्या वतीने तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रबोधन व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व, निसर्गाचा समतोल आणि वाढता मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.




वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल जायभाये, वनपाल एल. व्ही. तागड यांच्यासह वनरक्षक एस. बी. शिंदे, ए. एस. काळे, जे. बी. आरगडे, बी. ए. शिंदे, डी. बी. शेळके, के. डी. पदलवाड, के. बी. विदाते आदी वन कर्मचाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबविण्यात आले. १ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा, ३ ऑक्टोबर रोजी रोडेश्वर विद्यालय डोंगरगण व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेवाडी, तर ५ ऑक्टोबर रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय बीडसांगवी येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये अन्नसाखळीतील प्रत्येक सजीवाचे महत्त्व तसेच निसर्गाचा समतोल राखण्यात वन्यजीवांची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. बिबट्या व वाघ यांसारख्या वन्यप्राण्यांमुळे निर्माण होणारा मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी कोणती खबरदारी घ्यावी, याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहजीवन टिकविण्यासाठी वन्यजीवांविषयी असलेली भीती व गैरसमज दूर करून त्यांच्याबद्दल आपुलकी व आदराची भावना निर्माण करण्याचे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शाळा प्रशासन तसेच विद्यार्थ्यांनी स्वागत केले.

# आ. सतीश चव्हाण यांच्या सातत्यपूर्ण संपर्कासह मतदारसंघात उभारलेली संघटनात्मक बांधणी ठरणार महत्त्वाची

## चौथ्या विजयासाठी पदवीधर एकवटले

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे सलग तीन टर्म प्रतिनिधित्व करणारे आ. सतीशराव चव्हाण यांच्या चौथ्या विजयासाठी पदवीधर मतदार, कार्यकर्ते आणि समर्थकांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मागील १८ वर्षांच्या कालावधीत मतदारसंघातील पदवीधरांशी सातत्याने संपर्क ठेवत विविध प्रश्नांवर भूमिका मांडण्याबरोबरच संघटनात्मक पातळीवर उभारलेली बांधणी ही आ. चव्हाण यांच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाची बाब असल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येत आहे.



आ. सतीशराव चव्हाण यांनी २००८, २०१४ आणि २०२० या तीनही निवडणुकांमध्ये विजय मिळवत मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आ हे. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पुन्हा मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली असून, त्यामुळे पदवीधर मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

■ **पदवीधरांशी सातत्यपूर्ण संपर्क**

मतदारसंघातील विविध जिल्हे, तालुके आणि ग्रामीण भागात पदवीधर मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या प्रश्नांना विधान परिषदेत वाचा फोडण्याचा प्रयत्न करणे, हा आ. चव्हाण यांच्या कार्यपद्धतीचा महत्त्वाचा भाग असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. मतदारांशी केवळ निवडणुकीच्या काळात नव्हे, तर वर्षभर संपर्क ठेवण्यावर त्यांनी भर दिल्याचेही सांगण्यात येते.पदवीधरांच्या रोजगार, शिक्षण, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी तसेच सामाजिक क्षेत्राशी संबंधित प्रश्नांवर विधान परिषदेत त्यांनी वेळोवेळी भूमिका मांडल्याचे समर्थकांकडून नमूद करण्यात येते. सभागृहातील कामकाजाबरोबरच मतदारसंघातील विविध प्रश्नांवर संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही ते सांगतात.

■ **संघटनात्मक बांधणीला महत्त्व**

मतदारसंघातील प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत पोहोचणारी संघटनात्मक यंत्रणा उभारण्यावर आ. चव्हाण यांच्या समर्थकांनी भर दिला आहे. पदवीधर मतदारांची नोंदणी, नव्या मतदारांशी संपर्क, कार्यकर्त्यांच्या बैठका आणि स्थानिक पातळीवरील समन्वय यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक हालचालींना वेग आला आहे.छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि हिंगोली या आठ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या मतदारसंघात व्यापक संपर्काचे जाळे उभारणे हे मोठे आव्हान असते. या पार्श्वभूमीवर दीर्घकाळ मतदारसंघाशी असलेला संपर्क आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचे जाळे आगामी निवडणुकीत महत्त्वाचे ठरणार असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे.

■ **शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून आ. चव्हाण यांनी शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविल्याचे त्यांच्या समर्थकांकडून सांगण्यात येते. शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रश्न, शिक्षक व पदवीधरांच्या अडचणी तसेच विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना त्यांनी सातत्याने प्राधान्य दिल्याचा दावा करण्यात येत आहे.पदवीधर मतदारसंघ हा केवळ राजकीय प्रतिनिधित्वाचा मतदारसंघ नसून शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रश्नांशी थेट संबंधित मतदारसंघ असल्याने या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या नेतृत्वाला मतदारांकडून प्रतिसाद मिळतो, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे.

■ **चौथ्या विजयासाठी एकजुटीचे आवाहन**

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदवीधर मतदारांशी थेट संवाद वाढविणे, मतदार नोंदणीबाबत जनजागृती करणे, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि प्रत्येक तालुक्यात संघटनात्मक पातळीवर प्रभावी संपर्क ठेवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.आ. सतीशराव चव्हाण यांच्या चौथ्या विजयासाठी पदवीधर मतदार, कार्यकर्ते आणि समर्थकांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने काम करावे, असा सूर समर्थकांमध्ये आहे. सातत्यपूर्ण जनसंपर्क, मतदारांशी असलेले नाते आणि मतदारसंघातील संघटनात्मक बांधणी या बाबींच्या जोरावर आगामी निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्धार त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.दरम्यान, छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी ५ ऑक्टोबर २०२६ रोजी आ सतिश चव्हाण हे आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

# 'शिक्षण व्यवस्था मजबूत करणारा सक्षम आमदार विधान परिषदेत पाठवा'

## शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय देणारा अभ्यासू लोकप्रतिनिधी निवडण्याचे प्रा . अजित इथापे यांचे आवाहन

**आष्टी |** ढासळलेली शिक्षण व्यवस्था मजबूत करणारा, शिक्षक व पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय देणारा आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी सभागृहात प्रभावीपणे मांडून त्यावर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा करणारा सक्षम लोकप्रतिनिधी विधान परिषदेत पाठविणे गरजेचे आहे, असे मत शिक्षक संघटनेचे तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा. अजित इथापे यांनी व्यक्त केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित मतदार जनजागृती अभियानादरम्यान ते बोलत होते.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या तीन पदवीधर मतदारसंघांसह दोन शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), पुणे आणि नागपूर पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक मतदारसंघांचा यामध्ये समावेश आहे.

विना अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान मिळावे, यासाठी शिक्षकांनी अनेक वर्षे आंदोलने केली. अनेक शिक्षकांनी आर्थिक अडचणींचा सामना करत विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य सुरू ठेवले. मात्र, कायम अनुदानाच्या धोरणामुळे अनेक शिक्षकांना २०, ४० आणि ६० टक्के अनुदानाच्या टप्प्यांवरच सेवा बजावावी लागत असून, अनुदानाच्या प्रत्येक टप्प्यासाठी आंदोलने आणि उपोषणाच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करावा लागत असल्याचे प्रा. इथापे यांनी सांगितले.

शिक्षकांचे वेतन, पेन्शन योजना, थकीत बिले तसेच अनुदानाचे प्रश्न आजही प्रलंबित असून काही शिक्षकांना दीर्घकाळ सेवा करूनही पूर्ण अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. काही शिक्षकांनी १४ वर्षे विनाअनुदानित सेवा, त्यानंतर दोन वर्षे २० टक्के, दोन वर्षे ४० टक्के आणि केवळ एक वर्ष ६० टक्के अनुदानावर सेवा बजावत निवृत्ती घेतल्याचेही इथापे यांनी नमूद केले.

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न ठेवता त्यांचा अभ्यास करून विधान परिषदेत सातत्याने आवाज उठविणारा लोकप्रतिनिधी आवश्यक आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर परिस्थितीला दोष देण्यापेक्षा मतदानाच्या वेळी योग्य, अभ्यासू आणि सक्षम व्यक्तीची निवड करून शिक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन प्रा. अजित इथापे यांनी मतदार जनजागृती अभियानातून केले.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, बुधवार, 7 ऑक्टोबर 2026

# वाळुज जमीन प्रकरणात राम खाडे यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती : विष्णू खाडे

## जुना व पूर्वीच मिटलेला वाद पुन्हा उकरून काढण्याचा आरोप; प्राजक्तताई धस यांचा जमीन व्यवहाराशी कोणताही संबंध नसल्याचा दावा

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी तालुक्यातील वाळुंज गावातील जमीन व पिकाच्या वादाचे प्रकरण सध्या पुन्हा चर्चेत आले असून, या प्रकरणाबाबत चुकीची व अपुरी माहिती प्रसारित करून गैरसमज निर्माण केला जात आहेत तर या जमिनीचा आणि आदिवासी समाजातील व्यक्तींचा दूरपर्यंत कसलाही संबंध नसल्याचे देखील खाडे म्हणाले आरोप वाळुंजचे माजी सरपंच विष्णू खाडे यांनी केला आहे. संबंधित जमीन व्यवहार, तिचे संपादन, परतावा आणि त्यानंतर निर्माण झालेला पिकाचा वाद यांचा संपूर्ण घटनाक्रम उपलब्ध शासकीय कागदपत्रे व प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विष्णू खाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळुंज व तवलवाडी गावाच्या शिवारा नजीक सहस्त्रबुद्धे नामक व्यक्तीची गट क्रमांक ६७ मध्ये जमीन होती. सदर जमीन पूर्वी तलवार प्रकल्पासाठी शासनाकडून संपादित करण्यात आली होती. जमीन संपादनाच्या वेळी नियमानुसार मूळ जमीनमालकास शासनाकडून मावेजा अदा करण्यात आला होता. मात्र, प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्पासाठी आवश्यकतेपेक्षा काही जमीन अधिक प्रमाणात संपादित झाल्याचे निदर्शनास आले.

यानंतर शासनाने मूळ जमीनमालकास नोटीस बजावून अतिरिक्त संपादित जमिनीबाबत पूर्वी अदा केलेला मावेजा शासनाकडे जमा करून घेतला आणि प्रकल्पासाठी आवश्यक नसलेली अतिरिक्त जमीन मूळ जमीनमालकास परत करण्यात आल्याचा घटनाक्रम असल्याचे खाडे यांनी सांगितले.

यानंतर संबंधित जमीन रघुनाथ पवार यांनी कसण्यासाठी बटाईने घेतली होती. पवार यांनी या जमिनीवर पीक घेतले होते. मात्र, या पिकावरून काही स्थानिक व्यक्तींशी वाद निर्माण झाला. संबंधित व्यक्तींकडून आपल्याला धमक्या दिल्या जात असून पिकाची काढणी करण्यास अडथळा निर्माण केला जात असल्याची माहिती रघुनाथ पवार यांनी आमदार सुरेश धस यांच्या पत्नी प्राजक्ताताई धस यांना दूरध्वनीद्वारे दिली आणि मदतीची विनंती केली.

या फोननंतर प्राजक्ताताई धस काही कार्यकर्त्यांसह संबंधित ठिकाणी पोहोचल्या. तेथे सुरू असलेला वाद त्यांनी प्रत्यक्ष पाहिला आणि संबंधित व्यक्तींना परिस्थिती चिघळू नये, अशा शब्दांत समज दिल्याचे विष्णू खाडे यांनी सांगितले. त्यानंतर चर्चेतून व समन्वयातून संबंधित जमीन व



पिकाबाबतचा वाद मिटविण्यात आला होता, असा त्यांचा दावा आहे.

घटनेला वेगळे स्वरूप देण्याचा प्रयत्न

ही घटना त्या काळातील स्थानिक वादापुरती मर्यादित होती. तिचा कोणत्याही जमीन व्यवहाराशी किंवा त्यानंतरच्या कथित वादाशी संबंध जोडणे योग्य नाही, असे विष्णू खाडे यांनी स्पष्ट केले. पूर्वीच मिटलेल्या या प्रकरणाला पुन्हा वेगळे स्वरूप देऊन सोशल मीडियावर गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या घटनेशी प्राजक्तताई धस किंवा आमदार सुरेश धस यांचा कोणत्याही प्रकारच्या जमीन व्यवहाराशी संबंध नसल्याचे खाडे यांनी ठामपणे सांगितले. केवळ एका कार्यकर्त्याने अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी दूरध्वनी केल्यामुळे प्राजक्ताताई संबंधित ठिकाणी गेल्या होत्या. त्या उपस्थितीचा अर्थ जमीन व्यवहाराशी संबंध असल्याचा काढणे चुकीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

बनावट क्लिपच्या माध्यमातून बदनामीचा आरोप

दरम्यान, या जुन्या घटनेतील काही भागाचा आधार घेऊन प्राजक्ताताई धस यांना बदनाम करण्याच्या उद्देशाने बनावट किंवा संदर्भहीन क्लिप तयार करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचा आरोप विष्णू खाडे यांनी केला. वास्तविक घटनेची पार्श्वभूमी आणि संपूर्ण घटनाक्रम न समजून घेता केवळ एखाद्या व्हिडिओच्या आधारे निष्कर्ष काढणे समाजात गैरसमज निर्माण करणारे ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

आपण या गावचे माजी सरपंच असल्याने या संपूर्ण घटनेची प्रत्यक्ष माहिती आपल्याला असून, लवकरच या प्रकरणासंदर्भात अधिक सविस्तर माहिती व आवश्यक कागदपत्रे प्रसिद्धी माध्यमांसमोर मांडणार असल्याचेही विष्णू खाडे यांनी सांगितले.

"दुसऱ्याच्या गावातील विषयावर बोलताना वस्तुस्थिती तपासा"

दरम्यान, राम खाडे यांच्यावर टीका करताना विष्णू खाडे यांनी, "दुसऱ्याच्या गावातील एखाद्या घटनेबाबत बोलताना त्या घटनेची प्रत्यक्ष माहिती किती आहे, उपलब्ध कागदपत्रे काय सांगतात आणि वास्तविक घटनाक्रम काय आहे, याची खातरजमा करणे आवश्यक आहे," असा सल्ला दिला.

अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीच्या आधारे एखाद्या व्यक्तीचे नाव एखाद्या जुन्या प्रकरणाशी जोडणे योग्य नाही. त्यामुळे वाळुंज जमीन प्रकरणाकडे राजकीय किंवा सोशल मीडिया चर्चेच्या माध्यमातून नव्हे, तर उपलब्ध शासकीय कागदपत्रे, प्रत्यक्ष घटनाक्रम आणि वस्तुस्थितीच्या आधारे पाहावे, असे आवाहनही विष्णू खाडे यांनी केले आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत विष्णू खाडे यांनी लवकरच अधिकृत कागदपत्रांसह सविस्तर माहिती देणार असल्याचे सांगितल्याने या प्रकरणाला पुढील काळात कोणते वळण मिळते, याकडे लक्ष लागले आहे.

# संत एकनाथांच्या भागवतातून अध्यात्म आणि संसाराचा सुंदर समन्वय -ह.भ.प. प्रवीण महाराज गोसावी

## मुक्ताई लॉन्स येथे एकनाथी भागवत कथा प्रवचन सोहळ्याचा भाविकांना लाभ

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी :**

शांतिब्रह्म संत एकनाथ महाराजांचे एकनाथी भागवत हे केवळ पद्याचे गद्यात रूपांतर नसून, नाथांच्या जीवनदृष्टीशी एकरूप झालेल्या अधिकारी संताचे चिंतन आणि निरूपण आहे. संत एकनाथ महाराजांनी आपल्या वाणीच्या माध्यमातून संतवाङ्मय आणि सामान्य भाविक यांच्यातील काळाचे व भाषेचे अंतर कमी करून भक्तीचा मार्ग अधिक सुगम केला. त्यांच्या जीवनातून संसारात राहूनही परमार्थ साधता येतो आणि परमात्मवृत्तीने संसाराचे कर्तव्य पार पाडता येते, याचा आदर्श समाजासमोर ठेवला, असे प्रतिपादन ह.भ.प. प्रवीण महाराज गोसावी यांनी केले.

भास्करमामा चाटे व परिवाराच्या वतीने परळी-बीड रोडवरील मुक्ताई लॉन्स येथे मातृ-पितृ स्मरणार्थ आयोजित एकनाथी भागवत कथा प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. संत एकनाथ महाराजांचे ते १३ वे वंशज आहेत.या धार्मिक सप्ताहाचे आयोजन ३ ते



९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. तुकाराम गाथा पारायण, एकनाथी भागवत कथा, संतवाङ्मय, हरिनाम, प्रवचन आणि कीर्तनांच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक चिंतनाची पर्वणी मिळत आहे. यावेळी संत एकनाथ महाराजांनी समाजाला केवळ भक्तीचा उपदेश केला नाही, तर माणसाच्या अंतःकरणातील देवत्व ओळखण्याची दृष्टी दिली. त्यांच्या भागवत निरूपणामुळे संतांची वाणी सामान्य माणसाच्या अधिक जवळ आली असून, आजही त्यांच्या विचारांमधून जीवन जगण्याची दिशा मिळते, असेही प्रवीण महाराज गोसावी यांनी नमूद केले.भाविकांनी या अध्यात्मिक कार्यक्रमांस मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतवाङ्मय, हरिनाम श्रवणाचा लाभ घेतला. दरम्यान आजच्या प्रवचन श्रवणास शिवसेना (शिंदे) जेष्ठ नेते प्रा. टि.पी.मुंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक सौ. शोभाताई व श्री. भास्करराव चाटे (मामा), निळकंठ चाटे, दिनकर चाटे,सौ. स्मिता व ॲड गिरीशराव मुरकुटे,सौ. अर्चना व श्री. श्रीकांत चाटे, सौ. वैशाली व श्री. शशिकांत चाटे तसेच डॉ. सौ. गौरी उर्फ स्वप्ना व श्री. रविकांत चाटे व संपूर्ण चाटे परिवार परिश्रम घेत आहे.

# मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता नगरपालिकेने घरपट्टी, पाणीपट्टी रद्द करावी

## माजी शिक्षण सभापती तथा नगरसेवक गोपाळ आंधळे यांची मागणी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

मराठवाड्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी परळी नगरपालिकेने चालू वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी रद्द करावी, अशी मागणी माजी शिक्षण सभापती तथा माजी नगरसेवक गोपाळ आंधळे यांनी केली आहे.

यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने संबंधित तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून नागरिकांना विविध सवलती देण्यास सुरुवात केली आहे. तसेच विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णयही घेण्यात आला



आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनही दिलासा मिळणे आवश्यक असल्याचे आंधळे यांनी म्हटले आहे.

दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झाला आहे. उत्पन्नाचे साधन कमी झाले असताना नगरपालिका करांचा अतिरिक्त आर्थिक भार नागरिकांवर पडत आहे. त्यामुळे परळी नगरपालिकेने चालू आर्थिक वर्षाची घरपट्टी व पाणीपट्टी पूर्णपणे माफ करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी गोपाळ आंधळे यांनी केली आहे.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शासनाकडून ज्या पद्धतीने विविध सवलती दिल्या जात आहेत, त्याच धर्तीवर परळी नगरपालिकेनेही सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# मृत्यूनंतर महिनाभराने मयताच्या नावावर कर्जवाटप; चौधर कुटुंबाची तहसीलदारांकडे चौकशीची मागणी

## सेवा सहकारी सोसायटी आणि बँकेच्या कर्जप्रकरणावर गंभीर सवाल; निल प्रमाणपत्र व कागदपत्रे न देण्याचा आरोप



**आष्टी | प्रतिनिधी**

मयत झालेल्या व्यक्तीच्या नावावर त्यांच्या मृत्यूनंतर तब्बल महिनाभराने सेवा सहकारी सोसायटीमार्फत कर्जवाटप झाल्याचे दाखविण्यात आल्याचा गंभीर आरोप करत कारखेल खुर्द येथील अक्षय प्रल्हाद चौधर यांनी आष्टी तहसीलदारांकडे लेखी अर्ज केला आहे. या कथित कर्जप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अक्षय चौधर यांनी तहसीलदारांना दिलेल्या अर्जात म्हटले आहे की, त्यांचे वडील प्रल्हाद निवृत्ती चौधर यांचे ३ फेब्रुवारी २०११ रोजी निधन झाले. त्यांनी हयातीत सेवा सहकारी सोसायटीचे कोणतेही कर्ज घेतले नव्हते. तसेच कर्ज घेतल्याची माहिती कुटुंबीयांनाही नव्हती. मात्र, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा सु. देवळा, ता. आष्टी अंतर्गत असलेल्या सेवा सहकारी सोसायटीकडून त्यांच्या नावावर १४ मार्च २०११ रोजी कर्जवाटप झाल्याचे दाखविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

वडिलांच्या मृत्यूनंतर अवघ्या महिनाभराने त्यांच्या नावावर कर्जवाटप कसे झाले, असा सवाल अक्षय चौधर यांनी उपस्थित केला आहे. संबंधित कर्ज प्रत्यक्षात कोणी घेतले, कर्जासाठी कोणती कागदपत्रे सादर करण्यात आली आणि कर्ज मंजुरी व वाटपाची प्रक्रिया कशी पार पडली, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, वारसांना २०२०, २०२१ आणि २०२३ या वर्षांत सोसायटीकडून निल प्रमाणपत्र देण्यात आल्याचे अर्जदाराने नमूद केले आहे. मात्र, ४ जून २०२६ रोजी निल प्रमाणपत्राची मागणी केल्यानंतर ते देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पूर्वी निल प्रमाणपत्र देण्यात आले असताना आता ते देण्यास नकार का देण्यात आला, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित जमिनीवर सोसायटीचा कर्जबोजा अस्तित्वात होता, तर वारसांच्या नावावर जमीन कशी झाली, असा सवाल अर्जात करण्यात आला आहे. बँकेकडे कर्जप्रकरणाशी संबंधित कागदपत्रांची मागणी करूनही ती उपलब्ध करून दिली जात नसल्याचा आरोपही चौधर यांनी केला आहे.

अर्जदाराने तक्रारीत चार प्रमुख प्रश्न उपस्थित केले आहेत. मयत झाल्यानंतर त्यांच्या नावावर कर्ज कसे उचलण्यात आले, कर्जाचा बोजा असताना वारसांच्या नावावर जमीन कशी झाली, तीन वेगवेगळ्या वर्षांत सोसायटीकडून निल प्रमाणपत्र कसे देण्यात आले आणि मागणी करूनही कर्जासंबंधी कागदपत्रे का दिली जात नाहीत, याची उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित सोसायटी, बँक आणि कर्जप्रकरणातील सर्व कागदपत्रांची तपासणी करून सत्य परिस्थिती समोर आणावी. दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी अक्षय चौधर यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची लवकरात लवकर चौकशी करून योग्य ती कार्यवाही न झाल्यास आपण कुटुंबासह तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशाराही अर्जदाराने दिला आहे. त्यामुळे मृत्यूनंतर महिनाभराने मयत व्यक्तीच्या नावावर दाखविण्यात आलेल्या कथित कर्जवाटपाची प्रशासनाकडून कशी चौकशी केली जाते आणि त्यातून काय निष्पन्न होते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

प्रल्हाद चौधर यांनी सन. 2011 वर्षी कर्ज घेतलेले आहे हे कर्ज शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या कोणत्याही योजनेत बसले नाही त्यामुळे संबंधित कर्ज धारकांना बँकेचे कर्ज भरावेच लागेल तेव्हाच त्यांना बे- बाकी प्रमाणपत्र मिळणार आहे